पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांच्या विशेष दुरुस्तीच्या मापदंडात सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः मामात २०१५ /(२४२/२०१५)/सिंव्य(कामे)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २१ जानेवारी, २०१६

संदर्भ :-

1. **जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र मा मा तलाव २००८/(२९२/०८) सिंव्य(कामे) दि १७.७.२००८**
2. **जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र मामात २०१०/(२६८/१०)/ सिंव्य (कामे) दि.३०.११.२०१०**
3. **जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र संकीर्ण २०१०/५४३/प्रक्र २७/जल १ दि. ०६.०१.२०११**

प्रस्तावना :

जलसंपदा विभागाच्या कक्षेमध्ये असलेल्या २५० हेक्टरपेक्षा अधिक सिंचन क्षमता असलेल्या ३१ राज्यस्तरीय तसेच १०० ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या १०२ माजी मालगुजारी तलावांच्या संदर्भात संदर्भ क्र १ येथील शासन निर्णयान्वये विशेष दुरुस्तीचे मापदंड रु.२१,०००/- प्रती हेक्टर निश्चित करण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र २ येथील शासन निर्णयान्वये अशा कामांना रु १.०० कोटी किंमतीच्या मर्यादेपर्यत प्रशासकीय मान्यतेचे अधिकार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना प्रदान करण्यात आले आहेत. जलसंधारण विभागाच्या कक्षेमध्ये असलेल्या ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या माजी मालगुजारी तलावांच्या संदर्भात संदर्भ क्र ३ येथील शासन निर्णयान्वये विशेष दुरुस्तीचे मापदंड रु.२८,०००/- प्रती हेक्टर निश्चित करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात पाटबंधारे प्रकल्पाच्या परिरक्षण व दुरुस्तीच्या कामासाठी लागणारे बांधकाम साहित्य, मजूरीचे दर, मशिनरी सुटे भाग यांच्या किंमतीत वाढ झालेली आहे. यासाठी सदर मापदंडात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

जलसंपदा व जलसंधारण विभागाच्या कार्यक्षेत्रातील पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांच्या संदर्भात विशेष दुरुस्तीचे मापदंड पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे. माजी मालगुजारी तलावांच्या विशेष दुरुस्ती संदर्भातील मापदंड तीन भागात विहीत करण्यात येत आहेत.

१) दुरुस्ती व पुन: स्थापनाची कामे - भाग १

२) यांत्रिकी संघटनेच्या मशिनरीमार्फत गाळ काढणेचे काम- भाग २

३) अनुषंगिक खर्च - भाग ३

अ. क्र	मा.मा तलावांचा तपशील	जलसंपदा विभाग (रुपये प्रति हेक्टर)				जलसंधारण विभाग (रुपये प्रति हेक्टर)			
१	२	भाग १	भाग २	भाग ३	एकूण	भाग १	भाग २	भाग ३	एकूण
१	० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता असलेले माजी मालगुजारी तलाव	-	-	-	-	४८,०००	१०,०००	४,८००	६२,८००
२	१०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता असलेले माजी मालगुजारी तलाव	४०,०००	१०,०००	४,०००	५४,०००	४०,०००	१०,०००	४,०००	५४,०००
३	२५० हेक्टर वरील सिंचन क्षमता असलेले माजी मालगुजारी ततलाव	४०,०००	१०,०००	४,०००	५४,०००	-	-	-	-

सदर मापदंड हे सन २०१४-१५ चा महागाई निर्देशांक (Cost of Inflationü Index) गृहीत धरुन लागू करण्यात आले आहेत. या मापदंडात दरवर्षी दरवाढीच्या निर्देशांकामध्ये (Cost of Inflationü Index) होणारी वाढ अनुज्ञेय राहील. याबाबतचे परिपत्रक दरवर्षी दिनांक १ जून पर्यत जलसंपदा विभागाने निर्गमित करावे.

वरील मापदंड खालील अटींच्या अधीन राहून सुधारित करण्यात येत आहेत.

१) प्रशासकीय मान्यता योजनांतर्गत लेखाशिर्षाखाली देण्यात यावी.

२) तीनही भागांसाठी अंदाजप्रत्रकात स्वंतत्र तरतूद करून त्याची एकत्रित गोषवाऱ्याची किंमत प्रशासकीय मान्यतेसाठी विचारात घ्यावी. तीन भागांपैकी एखादया भागात होणाऱ्या बचतीचा लाभ अन्य भागाकरिता वापरता येणार नाही.

३) संदर्भ २ अन्वये कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी रु.१ कोटी किंमतीपर्यतच्या प्रकल्प अहवालांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान केले होते .आता या अधिकारात रु.२ कोटी पर्यत वाढ करण्यात येत आहे. प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करतांना त्यात सदर दुरुस्ती कामांमुळे नेमके किती अतिरिक्त सिंचन होणार आहे अथवा होणारे इतर लाभ यांचा तपशिल स्पष्टपणे समाविष्ट करावा. रुपये २ कोटीच्या मर्यादेच्या वरील प्रस्ताव शासनास प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात यावेत.

४) दुरुस्तीच्या कामांची किंमत प्रती हेक्टर दर आधारित परिगणीत करुन विशेष दुरुस्तीच्या कामाचा चढताक्रम लावून कमी खर्चाच्या योजना प्राथम्याने हाती घेण्यात याव्यात व त्यादृष्टीने कामाचे वार्षिक नियोजन करावे

५) दुरुस्ती करण्यापूर्वी महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ खाली सर्व तलाव अधिसूचित करावे. अधिसूचना क्र. १ व २ प्रसिध्द झाल्याशिवाय कामे हाती घेवू नयेत व कामाची सुरुवात झाल्यापासून आठ महिन्याच्या आत अधिसूचना क्र.३ प्रसिध्द करावयाची कार्यवाही करण्यात यावी . तसेच या कायद्याची सर्व कलमे या प्रकल्पांना लागू करावीत.

६) सदर तलाव दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतर हे तलाव पाणी वापर संस्थानां हस्तांतरीत करण्यात यावेत.

७) भाग २ चे काम विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडे उपलब्ध असलेल्या मशिनरीमार्फतच व गरजेनुसारच करणे अनिवार्य राहील. असे करताना यंत्रसाम्रगी वापरासाठी इंधन परिचलन व किरकोळ दुरुस्तीचा खर्च रु. १०,००० प्रति हेक्टरी या मर्यादेत ठेवावा. तसेच भाग -१ चे मातीकामही शक्यतो यांत्रिकी संघटनेमार्फत करावे.

८) हे कमाल मापदंड असले तरी कामाची निकड लक्षात घेवूनच किमान आवश्यक कामेच करण्यात यावीत, या दृष्टीकोनातून संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी काटेकोरपणा पाळणे गरजेचे आहे, व कामाची अंमलबजावणी विहीत पध्दतीने करण्यात यावी. त्या संदर्भात आवश्यक ती सचोटी व पारदर्शकता बाळगण्यात यावी.

९) केलेल्या दुरुस्तीमुळे नेमके किती अतिरिक्त सिंचन उपलब्ध झाले, कोणत्या शेतकऱ्यांना फायदा झाला याची माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करावी.

१०) अन्य कोणत्याही योजनेमधुन मागील १० वर्षात ज्या माजी मालगुजारी तलावांवर विशेष दुरुस्तीची कामे झाली असतील, अश्या माजी मालगुजारी तलावांवर विशेष दुरुस्तीसाठी पुन्हा खर्च करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत असा खर्च करणे अनिवार्य ठरल्यास शासनाची पूर्वमान्यता घ्यावी.

हा शासन निर्णय जलसंधारण विभागाच्या सहमतीने, नियोजन विभागाच्या अनौपचारीक क्रमांक २२१/ कार्यासन १४३४ दिनांक १६.१०.२०१५ च्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३१३/ व्यय १२ दिनांक २०.१०.२०१५ अन्वये देण्यात आलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०१२११११५८२६११२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjiv A Tatu

Digitally signed by Sanjiv A Tatu
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SE and Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sanjiv A Tatu
Date: 2016.01.21 12:00:16 +05'30'

सं.अ.टाटू
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई

२. मा.मंत्री,वित्त यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,
३. मा. मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,
४. मा. मंत्री, ग्राम विकास व जलसंधारण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण यांचे खाजगी सचिच, मंत्रालय, मुंबई
६. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन,मुंबई
७. मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन,मुंबई
८. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन,मुंबई
९. मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन,मुंबई
१०.महालेखापाल १/२(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
११.महालेखापाल १/२(लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
१२.स्वीय सहायक, अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.स्वीय सहायक, अप्पर प्रधान सचिव , नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.स्वीय सहायक, प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.स्वीय सहायक, प्रधान सचिव ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.स्वीय सहायक, सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद
१९.मुख्य अभियंता(पा) व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२०.मुख्य अभियंता, (यांत्रिकी) जलसंपदा विभाग, नाशिक
२१.मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर
२२.मुख्य अभियंता, विदर्भ संघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर
२३.आंतरवित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२४.माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२५.उप सचिव, (सिंव्य), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२६. उप सचिव,(जलसंधारण) ग्राम विकास व जलसधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
२७.अधीक्षक अभियंता व प्रशासक , लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर
२८. अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर
२९.अधीक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर
३०.अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ(उस), नागपूर
३१.अवर सचिव (सिंव्य/कामे), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
३२.ग्रंथालय, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
३३.सिंव्य(कामे)/कार्यासन, संग्रहार्थ.